श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## वेणु गीत



सुध बुध खोकर हुई बावरी, सुन मुरली की मधुर तान।
कृष्ण मिलन की आशा प्रकटी, ऐसा निर्मल वेणु गान ।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**दशमः स्कन्धः**

**॥ अथैकविंशोऽध्यायः ॥**

**श्रीशुक उवाच**

**इत्थं(म्) शरत्स्वच्छजलं(म्), पद्माकरसुगन्धिना ।**
**न्यविशद् वायुना वातं(म्), सगोगोपालकोऽच्युतः ॥ 1॥**

शरत्+ स्वच्छ+ जलं(म्), सगो+ गोपा+ लकोऽच्युतः

श्री शुक म्हणतात-शरद ऋतूमुळे जेथील पाणी निर्मळ झाले होते आणि जलाशयात उमल लेल्या कमळांचा सुगंध असलेला वारा वाहत होता, अशा वृंदावनात श्री कृष्णांनी गाई व गोपाळांसह प्रवेश केला

कुसुमितवनराजिशुष्मिभृं(ङ्)ग-

द्विजकुलघुष्टसरः(स्)सरिन्महीध्रम् ।

मधुपतिरवगाह्य चारयन् गाः(स्),

सहपशुपालबलश्चुकूज वेणुम् ॥ 2॥

कुसुमि+ तवनरा+ जिशुष्मि+ भृं(ङ्)ग, द्विजकु+ लघुष्ट+ सरः(स्)

सरिन्+ महीध्रम्, मधुपति+ रवगाह्य , सहपशुपा+ लबलश्+ चुकूज

तेथील फुलांनी बहरलेल्या वनराईत धुंद भ्रमर गुणगुणात होते आणि पक्षांचे थवे किलबिलाट करीत होते.त्यामुळे तेथील सरोवरे,नद्या आणि पर्वत नादमय झाले होते.श्रीकृष्णांनी बलराम आणि गोपालांबरोबर तेथे गाईचारीत असताना वेणू वाजविण्यास सुरुवात केली .

तद् व्रजस्त्रिय आश्रुत्य, वेणुगीतं(म्) स्मरोदयम् ।

काश्चित् परोक्षं(ङ्) कृष्णस्य, स्वसखीभ्योऽन्ववर्णयन् ॥ 3॥

स्वसखी+ भ्योऽन्+ ववर्णयन्

ते वेणू गीत भगवंतांविषयी प्रेम भाव जागृत करणारे होते.ते ऐकून काही गोपी सख्यांना श्रीकृष्णांच्या मागे त्यांच्याविषयी सांगू लागल्या .

तद् वर्णयितुमारब्धाः(स्), स्मरन्त्यः(ख्) कृष्णचेष्टितम् ।

नाशकन् स्मरवेगेन, विक्षिप्तमनसो नृप ॥ 4॥

वर्ण+ यितुमा+ रब्धाः(स्), कृष्ण+ चेष्टितम् , स्म+ रवेगेन , विक्षिप्+ तमनसो

हे राजा !श्रीकृष्णांच्या लीला आठवून त्यांचे त्यांनी वर्णन करण्यास सुरुवात केली खरी ;पण उत्कट प्रेमाने मन व्याकुळ झाल्यामुळे त्यांचे बोलणेच खुंटले .

बर्हापीडं(न्) नटवरवपुः(ख्) कर्णयोः(ख्) कर्णिकारं(म्),

बिभ्रद् वासः(ख्) कनककपिशं(वँ) वैजयन्तीं(ञ्) च मालाम् ।

रन्ध्रान् वेणोरधरसुधया पूरयन् गोपवृन्दैर्-

वृन्दारण्यं(म्) स्वपदरमणं(म्) प्राविशद् गीतकीर्तिः ॥ 5॥

वेणो+ रध+ रसुधया

त्या सांगू लागल्या गोपाळांसह श्रीकृष्ण वृंदावनात आले पहा !त्यांच्या मस्तकावर मोरपंख आहे आणि कानांवर कण्हेरीचे गुच्छ आहेत .त्यांनी सोन्यासारखा पितांबर परिधान केला असून

गळ्यामध्ये वैजयंती माळा घातली आहे.त्यांचे रूप श्रेष्ठ नतासारखे किती सुंदर आहे बरे !बासरीची इच्छिद्रे ते आपल्या अधरामृताने भरत आहेत.गोपाळ त्यांच्या कीर्तींचे गायन करीत आहेत .हे वृंदावन त्यांच्या चरणामुळे अधिकच रमणीय झाले आहे .

**इति वेणुरवं(म्) राजन्, सर्वभूतमनोहरम् ।**

**श्रुत्वा व्रजस्त्रियः(स्) सर्वा, वर्णयन्त्योऽभिरेभिरे ॥ 6॥**

वर्ण+ यन्त्योऽ+ भिरेभिरे

परीक्षिता !चराचराचे मन आकर्षण घेणारा वेणु नाद ऐकून सर्व गोपी त्याचे वर्णन करू लागल्या .आणि ते करीत असतानाच तन्मय होऊन त्या श्रीकृष्णांना मनाने आलिंगन देऊ लागल्या.

**गोप्य ऊचुः**

**अक्षण्वतां(म्) फलमिदं(न्) न परं(वँ) विदामः(स्),**

**सख्यः(फ्) पशूननु विवेशयतोर्वयस्यैः ।**

**वक्त्रं(वँ) व्रजेशसुतयोरनुवेणु जुष्टं(यँ),**

**यैर्वा निपीतमनुरक्तकटाक्षमोक्षम् ॥ 7॥**

अक्षण्+ वतां(म्), विवे+ शयतोर्+ वयस्यैः,

व्रजे+ शसुतयो+ रनुवेणु , निपी+ तमनुरक्त+ कटाक्षमोक्षम्

गोपी म्हणाल्या-अगं सख्यांनो !आम्ही डोळे असणाऱ्यांच्या डोळ्यांची एवढीच सार्थकता मानतो ,दुसरी नाही.ती हीच की,जेव्हा श्रीकृष्ण आणि बलराम मित्रांसह गुरे हाकीत वनात जातात किंवा परत येतात,तेव्हा वेणू वाजविणारे किंवा प्रेमळ नेत्रकटाक्षांनी आमच्याकडे पाहणारे त्यांचे मुखमल मनसोक्त पाहावे .

**चूतप्रवालबर्हस्तबकोत्पलाब्ज-**

**मालानुपृक्तपरिधानविचित्रवेषौ ।**

**मध्ये विरेजतुरलं(म्) पशुपालगोष्ठ्यां(म्),**

**रं(ङ्)गे यथा नटवरौ क्व च गायमानौ ॥ 8॥**

चूत+ प्रवा+ लबर्हस् + तब+ कोत्+ पलाब्ज,

माला+ नुपृक्त+ परिधा+ नविचित्र+ वेषौ, पशुपा+लगोष्ठ्यां(म्)

पितांबर धारी सावळे श्रीकृष्ण आणि नीलांबर नेसलेले बलराम जेव्हा आंब्याची पालवी,मोरपंख ,फुलांचे गुच्छ आणि रंगीबेरंगी कमलांच्या माळा धारण करतात.तेव्हा त्यांचा वेश अतिशय देखणा

वाटतो.गोपाळांच्या मध्ये बसून काही वेळा जेव्हा ते गाऊ लागतात,तेव्हा रंगमंचावर अभिनय करणाऱ्या दोन चतुर नटांसारखे ते किती शोभून दिसतात म्हणून सांगू ?

**गोप्यः(ख्) किमाचरदयं(ङ्) कुशलं(म्) स्म वेणुर्-**

**दामोदराधरसुधामपि गोपिकानाम् ।**

**भुङ्क्ते स्वयं(यँ) यदवशिष्टरसं(म्) ह्रदिन्यो,**

**हृष्यत्त्वचोऽश्रुमुमुचुस्तरवो यथाऽऽर्याः ॥ 9॥**

किमा+ चरदयं(ङ्), दामोदरा+ धरसुधा+ मपि

यदव+ शिष्टरसं(म्), हृष्यत्+ त्वचोऽ+ श्रुमुमुचुस्+ तरवो

अगं गोपींनो-या वेणू ने असे कोणते पुण्य केले आहे की, जो आम्हा गोपींचे हक्काचे दामोदर यांचे अधरमृत स्वतःच अशा प्रकारे पीत आहे की,त्याचा फक्त रस शिल्लक उरला आहे .या वेणूला आपल्या पाण्याने वाढविणारे जलाशय कमळांच्या निशाने रोमांचित होऊ लागले आहेत .आणि आपल्या वंशामध्ये जन्मलेल्या भगवतप्रेमी वेणूला पाहून वृक्ष सुद्धा श्रेष्ठ पुरुषांप्रमाणे 'भगवत भक्त आपला वंशज आहे.'हा विचार मनात येऊन मधुबिंदूच्या निशाने आनंदाश्रू ढाळीत आहेत .

**वृन्दावनं(म्) सखि भुवो वितनोति कीर्तिं(यँ),**

**यद् देवकीसुतपदाम्बुजलब्धलक्ष्मि ।**

**गोविन्दवेणुमनु मत्तमयूरनृत्यं(म्),**

**प्रेक्ष्याद्रिसान्वपरतान्यसमस्तसत्त्वम् ॥ 10॥**

देवकी+ सुतपदाम्+ बुजलब्ध+ लक्ष्मि, मत्+ तमयू+ रनृत्यं(म्)

प्रेक्ष्या+ द्रिसान्+ वपरतान्+ यसमस्+ तसत्त्वम्

**धन्याः(स्) स्म मूढमतयोऽपि हरिण्य एता,**

**या नन्दनन्दनमुपात्तविचित्रवेषम् ।**

**आकर्ण्य वेणुरणितं(म्) सहकृष्णसाराः(फ्),**

**पूजां(न्) दधुर्विरचितां(म्) प्रणयावलोकैः ॥ 11॥**

मूढ+ मतयोऽपि, नन्दनन्द+ नमुपात्+ तविचित्रवेषम्

वेणु+ रणितं(म्), दधुर्+ विरचितां(म्), प्रणया+ वलोकैः

गडे !देवकी नंदनाच्या चरण कमलांनी सुशोभित झालेले हे वृंदावन,पृथ्वीची कीर्ती चहुकडे पसरवीत आहे.जेव्हा श्रीकृष्ण मुरली वाजवतात,तेव्हा मोर धुंद होऊन नाचू लागतात आणि पर्वतशिखरांवरील पशु पक्षी स्तब्ध पणे हे पहात राहतात.तसेच जेव्हा सुंदर वेश धारण केलेले श्रीकृष्ण बासरी वाजवतात,तेव्हा मंदबुद्धीच्या हरणी सुद्धा ती ऐकत काळविटांसमवेत त्यांच्याजवळ येऊन प्रेम पूर्ण नेत्र कमळांनी त्यांची जणू पूजा करतात .

**कृष्णं(न्) निरीक्ष्य वनितोत्सवरूपशीलं(म्),**

**श्रुत्वा च तत्क्वणितवेणुविचित्रगीतम् ।**

**देव्यो विमानगतयः(स्) स्मरनुन्नसारा,**

**भ्रश्यत्प्रसूनकबरा मुमुहुर्विनीव्यः ॥ 12॥**

वनितोत्+ सवरू+ पशीलं(म्), तत्+ क्वणि+ तवे+ णुविचित्रगीतम्

विमा+ नगतयः(स्), स्मरनुन्+ नसारा, भ्रश्यत्+ प्रसू+ नकबरा, मुमुहुर्+ विनीव्यः

स्वर्गातील देवी जेव्हा युवतींना आनंदीत करणारे सौंदर्य आणि शील यांचा खजिना असलेल्या श्रीकृष्णांना पाहतात आणि त्यांनी बासरीवर गाईलेले मधुर संगीत ऐकतात तेव्हा मदनबाधेने वि व्हल होऊनत्या विमानातच आपली शुद्ध हरपून बसतात. त्यामुळे वेणीतील फुले गळून जमिनीवर पडत आहेत त्याची त्यांना जाणीव नसते की शालू कमरेवरून निसटताहेत ,याचेही त्यांना भान नसते .

**गावश्च कृष्णमुखनिर्गतवेणुगीत-**

**पीयूषमुत्तभितकर्णपुटैः(फ्) पिबन्त्यः ।**

**शावाः(स्) स्नुतस्तनपयः(ख्)कवलाः(स्) स्म तस्थुर्-**

**गोविन्दमात्मनि दृशाश्रुकलाः(स्) स्पृशन्त्यः ॥ 13॥**

कृष्णमुख+ निर्गत+ वेणुगीत, पीयू+ षमुत्तभित+ कर्णपुटैः(फ्)

स्नुतस्+ तनपयः(ख्), गोविन्+ दमात्मनि, दृशा+ श्रुकलाः(स्)

श्रीकृष्णांच्या मुखातून निघालेले वेणुगीत रूप अमृत गाईन टवकारून पितात.आपल्या डोळ्यातून शामसुंदरांना ह्रदयात घेऊन त्यांना अलिंगन देतात.त्यामुळे त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागतात.तसेच त्यांची वासरे गाईंच्या सडांतून कृष्ण प्रेमाने आपोआप स्रवणारे दूध तोंडात घेऊन तशीच उभी राहतात . त्यांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत असतात .

**प्रायो बताम्ब विहगा मुनयो वनेऽस्मिन्,**

**कृष्णेक्षितं(न्) तदुदितं(ङ्) कलवेणुगीतम् ।**

**आरुह्य ये द्रुमभुजान् रुचि*रप्रवालान्,**

**शृ*ण्वन्त्यमीलितदृशो विगतान्यवाचः ॥ 14 ॥**

रुचिर+ प्रवालान्, शृण्वन्त्य+ मीलि+ तदृशो, विगतान्+ यवाचः

अगं आई !या वनातील पक्षी हे बहुधा मुनीच आहेत. ते सुंदर पालवी फुटलेल्या झाडांच्या डहाळ्यांवर श्रीकृष्ण दिसतील अशा जागी किलबिल न करता गुपचूप बसतात आणि पापण्या न हलवता डोळ्यांनी त्यांचे रूप माधुर्यपहात राहतात.आणि त्यांनी वाजवलेली मोहक बासरी ऐकतात.

**न*द्य*स्तदा तदुपधार्य मुकु*न्दगीत-**

**मावर्तल*क्षितमनोभवभ*ग्नवेगाः ।**

**आलिं(ङ्)गन*स्थगितमूर्मिभुजैर्मुरारेर्-**

**गृह्ण*न्ति पादयुगलं(ङ्) कमलोपहाराः ॥ 15॥**

तदु+ पधार्य, मावर्+ तलक्षि+ तमनो+ भवभग्+ नवेगाः

आलिं(ङ्)गनस्+ थगितमूर्+ मिभुजैर्+ मुरारेर्, कमलो+ पहाराः

या नद्यांनीही श्रीकृष्णांच्या बासरीचा आवाज ऐकला आणि त्यांच्या मनात प्रेम भाव जागृत झाला .तेच हे भोवरे.त्यामुळे त्यांचा वाहण्याचा वेगही मंदावला.त्या तरंगरूपी हातांनी त्यांचे चरण पकडून त्यावर कमळे अर्पण करून त्यांना अलिंगन देत आहेत .

**दृष्ट्वाऽऽतपे व्रजपशून् सह रामगोपैः(स्),**

**सं(ञ्)चारय*न्तमनु वेणुमुदीरय*न्तम् ।**

**प्रेम*प्रवृ*द्ध उदितः(ख्) कुसुमावलीभिः(स्),**

**स*ख्युर्व्यधात् स्ववपुषाम्बुद आतप*त्रम् ॥ 16॥**

सं(ञ्)चा+ रयन्+ तमनु वेणुमुदी+ रयन्तम्

कुसुमा+ वलीभिः(स्), सख्युर्+ व्यधात्, स्व+ वपुषाम्+ बुद

श्रीकृष्ण आणि बलराम बालगोपालांसह भर उन्हात गाई सारीत आहेत आणि त्याचबरोबर बासरी वाजवीत आहेत, असे पाहून कृष्ण घनांच्या हृदयात प्रेम उचंबळून येते. ते आपल्याच वर्णनाच्या घनश्यामावर आपल्या शरीराचे छत्र धरून त्याच्यावर तुषार रूप पुष्पवर्षाव करतात.

**पूर्णाः(फ्) पुलिन्द्य उरुगायपदाब्जरा*ग-**

श्रीकुं(ङ्)कुमेन दयितास्तनमण्डितेन ।
तद्दर्शनस्मररुजस्तृणरूषितेन,
लिम्पन्त्य आननकुचेषु जहुस्तदाधिम् ॥ 17॥

उरुगा+ यपदाब्+ जराग, दयितास्+ तन+ मण्डितेन
तद्दर्शनस्+ मररुजस्+ तृणरूषितेन ,जहुस्+ तदाधिम्

जेव्हा या भिल्लीने कृष्णांना पाहतात ,तेव्हा त्यांच्या हृदयामध्ये प्रेमाची व्याधी निर्माण होते .त्यावेळी त्या गोपींच्या वक्षस्थळावरील जे केशर शामसुंदरांच्या चरणांना लागलेले असते ते 'श्रीकृष्ण जेव्हा गवतावरून चालतात 'तेव्हा त्याला चिकटते.या भाग्यशाली भिल्लीने ते त्या गवतांच्या काड्यांवरून काढून आपले स्तन आणि तोंडाला लावतात आणि अशा प्रकारे आपल्या हृदयातील प्रेमदाह शांत करता त .

हन्तायमद्रिरबला हरिदासवर्यो,
यद् रामकृष्णचरणस्पर्शप्रमोदः ।
मानं(न्) तनोति सहगोगणयोस्तयोर्यत्,
पानीयसूयवसकन्दरकन्दमूलैः ॥ 18॥

हन्ता+ यमद्रि+ रबला, रामकृष्णचरण+ स्पर्शप्रमोदः
सहगो+ गणयोस्+ तयोर्यत्, पानीयसू+ यवसकन्+ दरकन्+ दमूलैः

अगं गोपींनो !हा गोवर्धन भगवंतांच्या भक्तांमध्ये श्रेष्ठ आहे .धन्य आहे याचे भाग्य !श्रीकृष्ण - बलरामांच्या चरण कमलांचा स्पर्श झाल्याने हा किती आनंदीत होतो पाहा !हा गोपाल आणि गाई यांच्यासह या दोघांचाही मोठाच सत्कार करतो .तो त्यांना पाणी देतो ,गाईंसाठी गवत देतो .विश्रांतीसाठी गुहा आणि खाण्यासाठी कंदमुळे देतो .

गा गोपकैरनुवनं(न्) नयतोरुदार-
वेणुस्वनैः(ख्) कलपदैस्तनुभृत्सु सख्यः ।
अस्पन्दनं(ङ्) गतिमतां(म्) पुलकस्तरूणां(न्),
निर्योगपाशकृतलक्षणयोर्विचित्रम् ॥ 19॥

गोपकै+ रनुवनं(न्),कल+ पदैस्+ तनुभृत्सु
पुलकस्+ तरूणां(न्), निर्यो+ गपाशकृतल+ क्षणयोर् + विचित्रम्

अगं सख्यांनो !जेव्हा हे डोक्याला दोरी गुंडाळून आणि खांद्यावर फासा टाकून गोपाळांबरोबर गाईंना एका वनातून दुसऱ्या वनात हाकत जातात आणि त्याचवेळी मधुर बासरीही वाजवतात ,तेव्हा चालणारे देहधारी स्तब्ध होतात आणि अचल वृक्ष सुद्धा रोमांचित होतात .

**एवं(वँ्)विधा भगवतो, या वृन्दावनचारिणः ।**

**वर्णयन्त्यो मिथो गोप्यः(ख्), क्रीडास्तन्मयतां(यँ्) ययुः ॥ 20॥**

वर्ण+ यन्त्यो, क्रीडास्+ तन्मयतां(यँ्)

वृंदावन बिहारी श्रीकृष्णांच्या अशा एक नव्हे तर,अनेक लीलांचे आपापसात वर्णन करता करता गोपी तन्मय होऊन जात .

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**दशमस्कन्धे पूर्वार्धे वेणुगीतं(न्) नामैकविंशोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः॥**